**महाराष्ट्र शासन**

ई मेल :- nitin.surve@nic.in
दूरध्वनी क्र. ०२२-२२०२५३०९

क्रमांक:-सीओएम -२०१६/प्र.क्र.३५/संगणक कक्ष
वित्त विभाग,मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०९.०९.२०१६

प्रति,

१. प्रधान सचिव ( व्यय ), वित्त विभाग तथा अध्यक्ष, प्रकल्प अंमलबजावणी समिती.

२. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग,
३. प्रधान सचिव ( माहिती तंत्रज्ञान ), सा.प्र.वि,
४. प्रधान सचिव ( वित्तीय सुधारणा ), वित्त विभाग,
५. प्रधान सचिव ( लेखा व कोषागारे ), वित्त विभाग,
६. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय,
७. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राचे प्रतिनिधी,
८. उप सचिव, उद्योग विभाग,
९. उप सचिव तथा वि.का.अ.( कोषा )

} तथा सदस्य, प्रकल्प अंमलबजावणी समिती, वित्त विभाग

**विषय - दिनांक ०१.०९.२०१६ रोजी आयोजिलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) १८ व्या बैठकीचे इतिवृत्त...**

महोदय / महोदया,

दिनांक ०१.०९.२०१६ रोजी आयोजिलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) १८ व्या बैठकीचे इतिवृत्त माहिती / आवश्यक कार्यवाहीस्तव सोबत जोडले आहे.

( वर्षा डोंगरे )
उप सचिव तथा
समिती-सचिव

सहपत्र : वरीलप्रमाणे

विषय :- प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) दिनांक ०१/०९/२०१६ रोजी आयोजित १८ व्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रधान सचिव ( व्यय ) तथा समिती अध्यक्ष, प्रकल्प अंमलबजावणी समिती, यांच्या दालनात दिनांक ०१.०९.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रस्तुत समितीची बैठक आयोजिण्यात आली. सदर बैठकीस समितीचे पुढील सदस्य आणि अन्य संबंधित पदाधिकारी हजर होते.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.व्ही.गिरिराज | प्रधान सचिव ( व्यय ), वित्त विभाग तथा अध्यक्ष, प्रकल्प अंमलबजावणी समिती, |
| २ | श्री.स.अ.मु.नकवी | संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई |
| ३ | श्री.प्रताप मोहिते | संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, मुंबई, |
| ४ | श्रीमती चारुशीला तांबेकर | सहसचिव , नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई, |
| ५ | श्री.संजीव कुलकर्णी | सिनियर मॅनेजर, NICSI |
| ६ | श्री.जि.श.इंगळे | सहसंचालक, लेखा व कोषागारे, मुंबई |
| ७ | श्री.स.शि.तडकसे | सहसंचालक, सुधारणा |
| ८ | श्री.बी.डी.गोंदाणे | वैज्ञानिक -C , NIC |
| ९ | श्री.ना.भा.रिंगणे | उपसचिव (कोषा.प्रशासन) |
| १० | श्रीमती वर्षा डोंगरे | उपसचिव ( संगणक ) तथा समिती-सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ११ | श्री.समीर अ. सावंत | अवर सचिव, माहिती तंत्रज्ञान |
| १२ | श्री.जि.शं.काटे | सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, मुंबई, |
| १३ | श्रीमती शुभा फाटक | वैज्ञानिक -E , NIC |

<u>विषय क्रमांक १</u> भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) याकंपनीने ३८ जोडणी पुरविलेल्या MPLS Connectivity च्या मुदतवाढीस मंजुरी मिळणेबाबत :-

राज्यातील सर्व कोषागार कार्यालये, अधिदान व लेखा कार्यालय तसेच संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई व टिसीएल प्रभादेवी येथील सेंट्रल सर्व्हरशी जोडण्याकरिता भारत संचार निगम लिमिटेड, मुंबई यांचेकडून MPLS Connectivity स्थापन करण्यात आलेली आहे. सदर जोडणीवर येणारा खर्च दरवर्षी भारत संचार निगम लिमिटेड यांना आगाऊ प्रदान करण्यात येत आहे.

दिनांक २१/०४/२०१६ च्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या निर्देशानुसार सहा महिने ( माहे एप्रिल २०१६ ते सप्टेंबर २०१६ ) एमपीएलएस कनेक्टीव्हीटी घेण्यास व त्यावर होणाऱ्या खर्चास मान्यता दिली असून माहिती तंत्रज्ञान विभागाकडून संचालनालय लेखा व कोषागारे मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व कोषागार व उपकोषागार कार्यालयांकरिता एमएसव्हॅन ( MSWAN ) कनेक्टीव्हीटी ही पर्यायी व्यवस्था उपलब्ध होण्याच्या शक्यतेची तपासणी करण्याबाबत निर्देश दिले होते.

तथापि माहिती तंत्रज्ञान विभागाकडून संचालनालय लेखा व कोषागारे मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व कोषागार व उपकोषागार कार्यालयांकरिता एमएसव्हॅन ( MSWAN ) कनेक्टीव्हीटी आजपावेतो सुरु करण्यात आलेली नाही. संदर्भिय शासन पत्रानुसार MPLS Connectivity चा कालावधी माहे सप्टेंबर २०१६ मध्ये संपुष्टात येत आहे. तत्पूर्वी भारत संचार निगम लि. यांना पुढील सहा महिन्यांकरिता आगाऊ रक्कम रुपये २७,०८,२१६/- अदा करणे आवश्यक आहे. सदरचा खर्च विहित वेळेत संबंधीतांना प्रदान न केल्यास MPLS Connectivity बंद होईल व त्याचा परिणाम कोषागारातील दैनंदिन कामकाजावर होईल.

तरी संचालनालयाअंतर्गत विविध प्रणाली प्रभावीपणे व सुरळीत सुरु राहण्यासाठी भारत संचार निगम लिमिटेड यांचेकडून खालील ठिकाणी घेण्यात आलेल्या MPLS Connectivity ची मुदत ३० सप्टेंबर २०१६ रोजी संपुष्टात येत आहे. त्या अनुषंगाने भारत संचार निगम लिमिटेड यांनी संचालनालयाकडे माहे ऑक्टोंबर २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीसाठी आगाऊ प्रदानाची मागणी केली आहे.

| कार्यालयांची नावे | MPLS Connectivity |
|---|---|
| ६ विभागीय कोषागारे व अधिदान व लेखा कार्यालय | ६४ kbps |
| TCL Data Centre प्रभादेवी | २ mbps |
| TCL Data Centre प्रभादेवी | ८ mbps |
| जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे | ८ mbps |

| | |
|---|---|
| ११ वा मजला, मंत्रालय, मुंबई | २५६kbps |
| २६ कोषागार कार्यालय | ६४ kbps |
| TCL II DR Site हैद्राबाद | ५१२ kbps |
| कोषागार कार्यालय, पालघर | २ mbps |

भारत संचार निगम लिमिटेड यांना माहे ऑक्टोंबर या कालावधीसाठी २०१७ ते मार्च २०१६ -/२७,०८,२१६ रक्कम रुपयेएवढी रक्कम आगाऊ प्रदान करणे आवश्यक आहेतरी भारत संचार . निगम लिमिटेड यांना प्रदान करावयाची रक्कम तपशीलवार देयकाव्दारे आहरितकरण्यास तथा खर्चास प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता मिळावी.

सदरचा खर्च "मागणी क्र. जी-५,प्रधान लेखाशिर्ष-२०५४,कोषागारे व लेखा प्रशासन,(००) (९७) कोषागार आस्थापना, (००) (०२) संगणकीकरणावरील खर्च, २०५४०२०९, १७ संगणकावरील खर्च"लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष .च्या उपलब्ध अनुदानातून भागविण्यात येईल २०१७-२०१६

<u>समितीचे निर्देश</u> :- राज्यातील सर्व कोषागार कार्यालयेअधिदान व लेखा कार्यालय तसेच , मुंबई व टिसीएल प्रभादेवी येथील सेंट्रल सर्व्हरशी ,लेखा व कोषागारे ,संचालनालय मुंबई यांच ,जोडण्याकरिता भारत संचार निगम लिमिटेडकडून माहे ऑक्टोबर, २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीसाठी MPLS Connectivity सुरु ठेवण्यासाठी रुपये -/ २७,०८,२१६/-एवढी रक्कम आगाऊ प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

<u>विषय क्रमांक २ -</u> राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्या मार्फत विकसित होणाऱ्या (MAINS प्रणालीच्या WEB SECURITY AUDIT साठी ३ महिन्यांकरीता एक Application securityAuditorकनिष्ठ)) नेमणेसाठीच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत:-

श्री. वाय.जे.गोडबोले, तांत्रीक संचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र , पुणे यांचा दि. २०/०६/२०१६ रोजीचा या संचालनालयास प्राप्त झालेल्या ई-मेल संदेशान्वये MAINS प्रणालीवर काम करताना दि. ०१/०८/२०१६ ते दि.३१/०७/२०१७ मध्ये १) Portal for Review Report for Rural local bodies. २) Portal for Review Report for Urban local bodies ३) Complience submission portal for Rural & Urban local bodies ही विकसनाची कामे पूर्ण करावयाची असल्याने सदर उपक्रमासाठी portal विभागविकसीत करण्यासाठी ३ महिन्यांकरिता एक Application Security Auditor ( कनिष्ठ ) ची नेमणूक करण्यासाठी आर्थीक तरतूद उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे.

उपरोक्त उपक्रम राबविताना Web security audit करण्यासाठी NICSI, नवी दिल्ली

यांनी त्यांचे PROFORMA INVOICE NO. PMPMH १६१९३२ ,दि. २१/०६/२०१६ अन्वये एका Application Security Auditor ( कनिष्ठ ) च्या वेतनावरील ३ महिन्यांकरिता रु.३,२२,७६६/- इतका खर्च अपेक्षित असल्याबाबत कळविले आहे. सदरचा खर्च NICSI, नवी दिल्ली यांना आगाऊ द्यावा लागतो.

तरी कृपया उपरोक्त रु.३,२२,७६६/- इतक्या खर्चास प्रकल्प अंमलबजावणी समितीची प्रशासकीय मान्यता मिळावी, ही विनंती.

<u>समितीचे निर्देश</u> :- **राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्या मार्फत विकसित होणाऱ्या (MAINS प्रणालीच्या WEB SECURITY AUDIT साठी ३ महिन्यांकरीता एक Application securityAuditor(कनिष्ठ) नेमणेसाठीच्या रु.३,२२,७६६/- इतक्या खर्चास व सदर रक्कम आगाऊ प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

<u>विषय क्रमांक</u> -:**३मेसर्स निक्सी यांच्याकडून घेतलेल्या कार्यरत ४७प्रोग्रामर्सच्या पदांना मुदतवाढ व होणा.या खर्चास मान्यता देणेबाबत-**

एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली अंतर्गत संचालनालय, लेखा व कोषागारे यांच्या विविध संगणक प्रणाली राष्ट्रीय विज्ञान सूचना केंद्र, पुणे यांचेकडून विकसित करण्यात येतात. सदर प्रणालीचे देखभाल व परिरक्षण करण्याचे काम राष्ट्रीय विज्ञान सूचना केंद्र, पुणे यांचेकडून केले जात असल्याने त्यासाठी लागणारे तांत्रिक मनुष्यबळ मेसर्स निक्सी, नवी दिल्ली यांचेकडून करुन घेण्यासाठी खालील प्रकल्प अंमलबजावणी समितीने दिलेल्या मान्यतेनुसार तांत्रिक मनुष्यबळाच्या पदांना मान्यता देण्यात आली.

( अ ) दिनांक २४/०८/२०१५ रोजी झालेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत विषय क्रमांक ५ अन्वये ग्रास प्रणालीकरिता कार्यरत असलेल्या एका पदास एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार सदर प्रोग्रामर्सचे दिनांक ३०/०६/२०१६ पर्यंतची वेतनाची रक्कम मेसर्स निक्सी, नवी दिल्ली यांना अदा करण्यात आली आहे.

( ब ) दिनांक १९/११/२०१५ रोजी झालेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत विषय क्रमांक २ (ब) अन्वये कार्यरत असलेल्या चार प्रोग्रामर्सना श्रेणीवाढ, विषय क्रमांक २ (क) अन्वये सेवार्थ प्रणालीवरील तीन प्रोग्रामर्सच्या पदास, विषय क्रमांक ९ अन्वये एका प्रोग्रामर्सला श्रेणीवाढ तसेच या आठही प्रोग्रामर्सच्या नवीन पदास एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार विषय क्रमांक २ (ब) अन्वये कार्यरत असलेल्या चार प्रोग्रामर्सची दिनांक ३०/०६/२०१६ पर्यंत, विषय क्रमांक २ (क) अन्वये सेवार्थ प्रणालीवरील ३ प्रोग्रामर्सची दिनांक ३१/०८/२०१६ पर्यंत व विषय

क्रमांक ९ अन्वये एका प्रोग्रामर्सची दिनांक २०/०८/२०१६ पर्यंतची रक्कम मेसर्स निक्सी नवी दिल्ली यांना अदा करण्यात आली·आहे.

( क ) दिनांक ०६/०२/२०१६ रोजी झालेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत विषय क्रमांक ३ अन्वये संचालनालयाच्या विविध संगणक प्रणालीवरील कार्यरत असलेल्या ३८ प्रोग्रामर्सच्या पदांना एक वर्षाची मुदतवाढ व एका पदास श्रेणीवाढ एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार ३८ प्रोग्रामर्सची नियुक्तीनुसारच्या तारखेपर्यंतचे अनुक्रमे दिनांक ३०/०६/२०१६, २६/०७/२०१६ व ३१/०७/२०१६ पर्यंतची रक्कम मेसर्स निक्सी, नवी दिल्ली यांना अदा करण्यात आली आहे.

वरील (अ),(ब) व (क) अन्वये संचालनालयाच्या विविध प्रणालीवर कार्यरत एकूण ४७ पदांना मुदतवाढ देण्यात आली असून त्यांच्या पुढील कालावधीच्या वेतनासाठी रक्कम मे.निक्सी, नवी दिल्ली यांच्याकडे प्रोफार्मा इनव्हाईसची मागणी केली असता सदर पदांबाबतचे त्यांचे कॅट-बी हे वेतन दर्शविणारे विवरणपत्र रद्द केल्याचे मे.निक्सी, पुणे येथील प्रतिनिधी श्री.संजीव कुलकर्णी यांनी सांगितले. या अनुषंगाने त्यांनी श्री.राजीव गोयल, डेप्युटी जनरल मॅनेजर, निक्सी, नवी दिल्ली यांचा याबाबतच्या ई-मेलची प्रत पाठवून निक्सी, नवी दिल्ली यांच्या मान्यताप्राप्त Impanelled Agency कडे असलेल्या पदांच्या समकक्षात प्रोग्रामर्सचा प्रोफार्मा इनव्हाईस मागणी करावी असे सांगितले. (प्रत संलग्न) मे.निक्सी, नवी दिल्ली यांच्या नवीन एम्पॅनल्ड ऐजन्सीनुसार सद्या कार्यरत प्रोग्रामर्सचे वेतनाच्या समकक्षात आणून नवीन वेतनश्रेणी व त्यानुसार शासनास अदा करावा लागणारा दर याबाबत प्रोग्रामर्सच्या नवीन पदनामानुसार मे.निक्सी, नवी दिल्ली यांचेकडून ४६ प्रोग्रामर्सचे १२ महिन्यांचे व एका प्रोग्रामरचे अकरा महिन्याची रक्कम याप्रमाणे प्रोफार्मा इनव्हाईस क्रमांक PMPMH१६२३३७ दिनांक १३/०७/२०१६ (प्रत संलग्न) प्राप्त झाला असून त्याचा तपशील सोबत जोडलेल्या तक्यात दर्शविण्यात आला आहे.

वरील प्राप्त प्रोफार्मा इनव्हाईसनुसार मेसर्स निक्सी, नवी दिल्ली यांना ४७ पदानुसारची अदा करावयाची रक्कम रुपये २,६०,५५,४६७/- यास प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

सदरचा खर्च मागणी क्रमांक जी-५, प्रधान लेखाशीर्ष २०५४, कोषागार व लेखा प्रशासन, (००) (९७) कोषागार आस्थापना, (००) (०२) संगणकीकरणावरील खर्च (२०५४०२०९), १७ संगणकावरील खर्च या लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष २०१६-२०१७ करीता मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल.

समितीचे निर्देश :- मेसर्स निक्सी यांच्याकडून घेतलेल्या ४६ प्रोग्रामर्सना १ वर्षाची व १ प्रोग्रामरला ११ महिन्यांची मुदतवाढ व त्यावर होणाऱ्या रु.२,६०,५५,४६७/- इतका खर्च निक्सीच्या अटी शर्तीनुसार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

विषय क्रमांक ४:- मेसर्स टीसीएल यांना माहे ऑक्टोंबर, २०१६ ते माहे डिसेंबर, २०१६ पर्यन्त या तिमाहीकरिता मॅनेज्ड होस्टिंग सर्व्हिसेसकरिता मुदतवाढ देण्याबाबत प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता मिळणेबाबत :-

दिनांक २४/०२/२०१६ रोजीच्या उच्चाधिकारी समितीने मॅनेज्ड होस्टिंगकरिता नव्याने निविदा काढण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्या मार्फत निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, त्या अनुषंगाने क्रमांक:संलेको-२०१६/मॅनेज्ड होस्टिंग/नस्ती क्रमांक-११/भाग-२/२८०, दिनांक १४/०६/२०१६ च्या पत्राने संचालनालयाने प्रस्ताव वित्त विभागास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्त विभाग (कोषा-प्रशा-५) नस्ती क्रमांक-४०/२०१५ अन्वये संचालक, माहिती तंत्रज्ञान यांच्याकडे अभिप्रायास्तव व सदर प्रस्तावास / निविदेस उच्चाधिकार समितीची मान्यता घेण्यासाठी सादर करण्यात आली आहे.

जर सदर प्रस्तावास उच्चाधिकार समितीची मान्यता ही ऑगस्ट, २०१६ च्या अखेरपर्यन्त मान्यता मिळाली तरी मॅनेज्ड होस्टिंगकरिता पात्र ठरलेल्या पुरवठादाराना पुरवठा आदेश देणे व पुरवठा आदेश दिल्याच्या तारखेपासून पुरवठादाराकडून निविदेमध्ये संगणकीय प्रणाली सुस्थितीत चालू राहण्यांच्या दृष्टीने नमूद केलेल्या हार्डवेअर व सॉफ्टवेअर, इत्यादी बाबींची प्रतिष्ठापना करण्यास किमान ४५ दिवसांचा कालावधी आवश्यक राहील.

पुरवठादाराने निविदेमध्ये नमूद केलेल्या बाबींची प्रतिष्ठापना झाल्यानंतर सद्यस्थितीत चालू असलेल्या सर्व संगणकी प्रणालीचा डेटा हा नव्याने उपलब्ध असलेल्या सर्व्हरसवर ( हार्डवेअर व सॉफ्टवेअर ) प्रतिष्ठापीत करण्यास किमान एक महिन्याचा कालावधी लागू शकतो.

मेसर्स टीसीएल यांना माहे ऑक्टोंबर, २०१६ ते माहे डिसेंबर, २०१६ पर्यन्त मॅनेज्ड होस्टिंग सर्व्हिसेसकरिता मुदतवाढ दिल्यास त्यांना प्रचलित दराप्रमाणे ऑक्टोंबर, २०१६ ते डिसेंबर, २०१६ या तिमाही कालावधीसाठी रक्कम रुपये ७८,५३,९३५/- ( कराव्यतिरिक्त ) एवढा खर्च येणार असून आणि उच्चाधिकार समितीने त्यांना सादर केलेल्या नवीन निविदेस मंजूरी दिल्यास प्रति तिमाही रक्कम रुपये ९१,२७,४६८/- ( कराव्यतिरिक्त ) ( मूळ निविदेचा दर रुपये ५६,६६,२००/- व ४ आवश्यक तांत्रिक बाबींचा पुरवठा करणेकरता रुपये ३४,६१,२६८/- अशी एकूण ९१,२७,४६८/- ) एवढा येईल. तसेच असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, मुदतवाढ न दिल्यास किंवा

निविदेस मंजूरी मिळाली नाही तर वित्त विभाग व संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत संयुक्तरित्या राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रणाली योग्यरित्या व सुस्थितीत वापराकरिता उपलब्ध होऊ शकणार नाही.

उपरोक्त सर्व परिस्थितीचा विचार करता मेसर्स टीसीएल यांच्या बरोबर केलेल्या जुन्या करारास माहे ऑक्टोंबर, २०१६ ते माहे डिसेंबर, २०१६ पर्यन्त तीन महिन्यांची मुदतवाढ मिळणेबाबत प्रकल्प अंमलबजावणी समितीस मान्यतेस्तव सादर.

मेसर्स टीसीएल यांना माहे ऑक्टोंबर, २०१६ ते माहे डिसेंबर, २०१६ पर्यन्त या तिमाहीकरिता मॅनेज्ड होस्टिंग सर्व्हिसेसकरिता सद्यस्थितीत प्रचलित असलेल्या दराने म्हणजेच रुपये ७८,५३,९३५/ ( कराव्यतिरिक्त ) चा खर्च मागणी क्रमांक जी-५ २०५४ कोषागार व लेखा प्रशासन, ०९७ कोषागार आस्थापना (००)(०२) संगणकीकरणावरील खर्च (२०५४-०२०९), १७ संगणकावरील खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०१६-२०१७ च्या उपलब्ध तरतूदीतून खर्च करण्यात येईल.

**<u>समितीचे निर्देश</u> :- मेसर्स टीसीएल यांना माहे ऑक्टोंबर, २०१६ ते माहे डिसेंबर, २०१६ पर्यन्त या तिमाहीकरिता मॅनेज्ड होस्टिंग सर्व्हिसेसकरिता सद्यस्थितीत प्रचलित असलेल्या दराने म्हणजेच रुपये ७८,५३,९३५/ ( कराव्यतिरिक्त ) इतका निधी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**<u>विषय क्रमांक ५ -</u>राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र , पुणे येथे करार पध्दतीने नेमणूक केलेल्या प्रोग्रामर्सना माहे जुलै २०१७ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत.**

या संचालनालयाचे आवक पत्र क्र. स्था. ७२५ वरील NIC, पुणे यांचे पत्र क्र. एनआयसी/ एसडीयु/ पुणे/ एमएआयएनएस / २०१६/ १३१, दि. १०/०६/२०१६ अन्वये राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र ,पुणे यांनी Maharashtra Audit Information Network System (MAINS) प्रणालीवर काम करण्याकरिता कंत्राटी तत्वावर नेमलेले एकूण ५ प्रोग्रामर्स (१ वरिष्ठ व ४ कनिष्ठ ) श्री. अनंत पारखे - Database Administration Support (DAS) Level ४, श्रीमती. केतकी रत्नपारखी - (DAS) Level - ३, श्रीमती सारिका खोडके - (DAS) Level २, श्री. अमोल कोल्हे - (DAS) Level २, श्री. संतोष भोसले - (DAS) Level १ यांचा करार कालावधी सोबतच्या तक्तांनुसार दि. ३१/०७/२०१६ रोजी संपुष्टात येत असल्याने तसेच MAINS प्रणाली विकसन व परिरक्षणाचे कामकाज अद्याप सुरु असल्याने सदर प्रोग्रामर्सना एक वर्षासाठी माहे जुलै २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यास विनंती केली आहे.

दि. २४/०८/२०१५ रोजीच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत MAINS प्रणालीकरिता एकूण ८ प्रोग्रामर्सच्या नियुक्तीस (कार्यरत ६ व अतिरिक्त २ ) मान्यता प्रदान

करण्यात आली आहे.

तथापि या मंजूर प्राप्त ८ प्रोग्रामर्सपैकी वाढीव २ प्रोग्रामर्सची नियुक्ती योग्य व्यक्ती न मिळाल्याने करण्यात आली नाही.

या संचालनालयाचे पत्र क्र. स्था १८/ब/MAINS /कंत्राटी पध्दतीने PROGRAMMER /मुदतवाढ/न.क्र. ५५/संगणक शाखा/१२७४, दि.२२/०६/२०१६ रोजी शासनास प्रस्ताव सादर केला आहे. एकूण ८ प्रोग्रामर्सच्या करार कालावधीस एका वेतनवाढीसह एक वर्षासाठी माहे जुलै २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली आहे.

त्यानुसार NICSI , नवी दिल्ली यांचे Proforma Invoice NO. PMPMH १६१८६८,दि. २०/०६/२०१६ अन्वये एकूण ८ प्रोग्रामर्सच्या करार कालावधीस एका वेतनवाढीसह एक वर्षासाठी त्यांच्या वेतनावरील खर्च रु. ३७,८४,५६६/- इतका खर्च अपेक्षित असल्याबाबत कळविले आहे. सदरचा खर्च हा NICSI , नवी दिल्ली यांना आगाऊ द्यावा लागतो.

तरी विनंती करण्यात येते की, उपरोक्त रु. ३७,८४,५६६/- खर्चास प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता मिळावी.

<u>समितीचे निर्देश</u> :- सविस्तर माहितीसह सदर विषय पुढील बैठकीत मांडावा असे निर्देश देण्यात आले

## <u>आयत्या वेळचा विषय</u>

विषय क्र.६ :- दि. ९.३.१५ च्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीतील विषय क्र. ४ नुसार अर्थसंकल्प शाखेस मे. निक्सी यांनी सर्व्हरचा पुरवठा न केल्याबाबत, तसेच अर्थसंकल्प शाखेस डी.बी.२ प्रणालीवर काम करण्यासाठी आणखी एक प्रोग्रॅमर उपलब्ध करुन देण्याबाबत.

दिनांक ९.३.१५ च्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

| Agenda Item | Decision Taken |
|---|---|
| Purchase of two servers with one rack for Finance Department | The PIC approved the proposal of purchase of two servers with one rack for Finance Department from M/s. NICSI as per rate contract and sanctioned the amount of Rs.13,61,221/- (inclusive of taxes) for the same. |

उपरोक्त निर्णयानुसार संचालक ले.व को. यांनी प्रोफार्मा इन्हॉईस क्र. PHWMH ४६०९४ दि. १३.१.२०१५ व क्र. PHWMH ४३५३० दि.१७.१.२०१५ नुसार सर्व्हर आणि रॅक खरेदीकरिता रु. १३,६१,२२१/- चे आगाऊ प्रदान केलेले आहे. त्यानुसार निक्सीने एक सर्व्हर व रॅकचा पुरवठा केला असून उर्वरित सर्व्हरचा पुरवठा करणे अद्याप बाकी आहे. सदर वस्तुस्थिती प्रकल्प अंमलबजावणी समितीला सादर करण्यात आली. तसेच राज्याचा अर्थसंकल्प डी.बी.२ प्रणालीवर करण्यासाठी सध्या कार्यरत असलेल्या दोन प्रोग्रॅमर्स व्यतिरिक्त आणखी एक प्रोग्रॅमर उपलब्ध होण्याची आवश्यकता प्रकल्प अंमलबजावणी समितीस सादर करण्यात आली.

**समितीचे निर्देश** :- अर्थसंकल्प शाखेस दुसरा सर्व्हर तसेच उपरोक्तनुसार आणखी एक प्रोग्रॅमर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही तात्काळ करण्याचे निर्देश संचालक, लेखा व कोषागारे यांना देण्यात आले.

-*-*-*-*-